आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२१ मे २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या, इयत्ता बारावीच्या परीक्षेत ९३ पूर्णांक ३७ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण
- पुण्यातल्या कल्याणीनगर भागात झालेल्या अपघातप्रकरणी कुणालाही पाठीशी न घालता कठोर कारवाई करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश / अल्पवयीन आरोपी आणि त्याच्या वडलांवरही गुन्हा दाखल
- जागतिक बॅडमिंटन क्रमवारीत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही भारतीय जोडी पुन्हा अव्वलस्थानी

  **आणि**
- येत्या दोन दिवसांत राज्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता / उत्तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात उष्णतेची लाट

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. त्यात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचं प्रमाण ९३ पूर्णांक ३७ शतांश टक्के आहे. गेल्यावर्षी पेक्षा यंदा हे प्रमाण २ पूर्णांक १२ शतांश टक्क्यानी वाढलं आहे.

यंदा या परीक्षेसाठी राज्यातल्या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १४ लाख २३ हजार ९७० नियमित विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १३ लाख २९ हजार ६८४ जण उत्तीर्ण झाले आहेत. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचं प्रमाण अधिक असून त्याची टक्केवारी ९५ पूर्णांक ४४ शतांश टक्के इतकी आहे. तर ९१ पूर्णांक ६ दशांश टक्के मुलं उत्तीर्ण झाली आहेत.

यंदा कोकण विभागात सर्वाधिक ९७ पूर्णांक ५१ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुंबई विभागाचा निकाल सर्वात कमी असून त्याची टक्केवारी

९१ पूर्णांक १५ शतांश इतकी आहे. पुणे विभागाचा निकाल ९४ पूर्णांक ४४ शतांश टक्के इतका लागला आहे. शाखानिहाय निकालात यंदा विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांचं उत्तीर्ण होण्याचं प्रमाण सर्वाधिक आहे, यात ९७ पूर्णांक ८२ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

**<><><><><>**

पुण्यातल्या कल्याणीनगर भागात झालेल्या अपघातप्रकरणी कुणालाही पाठीशी न घालता कठोर कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्याच्या पोलीस आयुक्तांना दिले आहेत. वाहन चालवण्याचं रीतसर प्रशिक्षण आणि परवाना नसूनही अल्पवयीन आरोपीच्या वडलांनी त्यांची कार त्याला दिल्याची माहिती अल्पवयीन आरोपीनं पोलिसांना दिली होती. यानंतर उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडनवीस यांनीही या प्रकरणाची दखल घेत पोलिसांना निर्देश दिले होते. या प्रकरणाच्या तपासाची माहिती फडनवीस यांनी आज घेतली. सुधारित बालगुन्हेगारी कायद्यातल्या तरतुदींनुसार पोलिसांनी या प्रकरणी अल्पवयीन आरोपीवर कलम ३०४ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तसंच आरोपीच्या वडलांवरही गुन्हा दाखल झाला आहे. दोषींवर कारवाई केली जाईल, असं आश्वासनही फडनवीसांनी दिलं.

या अपघातात दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला होता. यातल्या अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल याला पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमधून आज अटक केली. तसंच अल्पवयीन मुलांना मद्य दिल्याप्रकरणी बारचा मालक आणि व्यवस्थापकालाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

**<><><><><>**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया येत्या १ जून रोजी सुरु होणार असून, यंदा पारंपरिक अभ्यासक्रमांबरोबर

रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरु करणार असल्याचं कुलगुरू डॉक्टर मनोहर चासकर यांनी आज सांगितलं.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदव्युत्तर स्तरावर एम.एस्सी, डेटा सायन्स, जिओ इन्फॉर्मेटिक्स, औद्योगिक मानसशास्त्र, पदव्युत्तर बी एस्सी, डेटा सायन्स, बीसीए आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, बीबीए, बीएमएलटी, न्यूट्रिशियन अँड डायट्स, डिप्लोमा इन डिजिटल मार्केटिंग, डिप्लोमा इन बँकिंग, डिप्लोमा इन मोबाईल रिपेरिंग, सायबर सिक्युरिटी यासारखे रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू केले जातील असंही ते म्हणाले.

कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमांबरोबर व्हॅल्यू ॲडेड अभ्यासक्रमही यावर्षीपासून सुरू केले जातील. तसंच हे अभ्यासक्रम वेगवेगळ्या उद्योग कंपन्याशी सामंजस्य करार करून राबवले जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

मुंबई महानगर पालिका पावसाळापूर्व नालेसफाई कामात निष्काळजीपणा दाखवत असल्याचा आरोप मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांनी केला आहे. पालिकेने ७५ टक्के नालेसफाई झाल्याचा केलेला दावा खोटा असून नालेसफाईच्या कामाबाबत मुंबई महापालिका आयुक्तांनी श्वेतपत्रिका काढावी अशी मागणी त्यांनी केली आहे. पश्चिम उपनगरातल्या नालेसफाईच्या कामाची पाहणी केल्यानंतर आज ते वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><><>

माजी प्रधानमंत्री दिवंगत राजीव गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त देश त्यांना आदरांजली वाहत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राजीव गांधी यांना समाजमाध्यमावरून आदरांजली वाहिली. तसंच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी नवी दिल्लीत वीर भूमी इथं

राजीव गांधी यांच्या स्मृतीस्थळावर जाऊन अभिवादन केलं. राजीव गांधी यांचा स्मृतीदिन देशात दहशतवाद विरोधी दिन म्हणून पाळला जातो.

<><><><><>

भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं नुकत्याच पार पडलेल्या थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत अजिंक्यपद पटकावल्यानंतर जागतिक बॅडमिंटन संघटनेच्या क्रमवारीत पुन्हा अव्वलस्थानी झेप घेतली. या स्पर्धेच्या आधी ही जोडी तिसऱ्या क्रमांकावर होती. मात्र, उत्तम कामगिरीच्या जोरावर त्यांनी या स्पर्धेतले सर्व सामने थेट गेम्समध्ये जिंकले आणि जागतिक क्रमवारीत पहिलं स्थान पुन्हा मिळवलं.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायजर्स हैदराबाद आणि कोलकता नाईट राईडर्स यांच्यात पात्रता फेरीतला पहिला सामना रंगणार आहे.

अहमदाबादमधल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर थोड्याच वेळात म्हणजे संध्याकाळी साडे सात वाजता हा सामना सुरु होईल.

सनरायझर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

पात्रता फेरीतला दुसरा सामना उद्या राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात होईल. स्पर्धेतला अंतिम सामना रविवारी होणार आहे.

<><><><><>

धुळे शहरातल्या अवधान परिसरात औद्योगिक वसाहतीतल्या फटाक्याच्या गोदामाला आज सकाळी आग लागून स्फोट झाला. या स्फोटात शेजारच्या प्लायवूड आणि हल्दीराम कंपनीच्या गोदामातला माल जळून मोठं नुकसान झालं. आगीचं कारण अद्याप कळू शकलं नसल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सिंदेवाही इथल्या शाखेच्या इमारतीला आज सकाळी लागलेल्या आगींमुळं बँकेचं प्रचंड नुकसान झालं आहे. बँकेतलं महत्त्वाचं साहित्य जळून खाक झाल्याचं सूत्रांनी म्हटलं आहे. अग्निशमन दलानं आगीवर नियंत्रण मिळवल्याचं वृत्त असून सिंदेवाही पोलिस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

**<><><><><>**

विमानाला धडकल्यामुळे काल मुंबईत ३५ पेक्षा जास्त फ्लेमिंगो पक्षी मृत्यूमुखी पडले. एमिरेट्स कंपनीचं हे विमान मुंबई विमानतळावर उतरताना घाटकोपरजवळ हा अपघात झाला. फ्लेमिंगो पक्षी परतीच्या प्रवासात होते. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी फ्लेमिंगोंचे मृतदेह ताब्यात घेतले असून या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे.

**<><><><><>**

लोकसभा निडवणुकीच्या पाचव्या टप्प्यात काल राज्यातल्या १३ मतदारसंघांमध्ये मतदान झालं. एकंदर ५४ पूर्णांक ३३ शतांश टक्के मतदान झाल्याचं निवडणूक कार्यालयानं कळवलं आहे. यापैकी सर्वाधिक ६२ पूर्णांक ६६ शतांश टक्के मतदान दिंडोरी मतदारसंघात, त्याखालोखाल ६१ पूर्णांक ६५ शतांश टक्के मतदान पालघर जिल्ह्यात झालं. दक्षिण मुंबई मतदारसंघात सर्वात कमी, ४७ पूर्णांक ७ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

धुळ्यात ५६ पूर्णांक ६१ शतांश टक्के,
नाशिकमध्ये ५७ पूर्णांक १० शतांश टक्के,
भिवंडीत ५६ पूर्णांक ४१ शतांश टक्के,

कल्याणमध्ये ४७ पूर्णांक ८ शतांश टक्के, तर ठाणे मतदारसंघात ४९ पूर्णांक ८१ शतांश टक्के मतदान झालं.

उत्तर मुंबईत ५५ पूर्णांक २१ शतांश टक्के,

उत्तर मध्य मुंबईमध्ये ५१ पूर्णांक ४२ शतांश टक्के,

उत्तर पूर्व मुंबई मतदारसंघात ५३ पूर्णांक ७५ शतांश टक्के,

उत्तर पश्चिम मुंबईत ५३ पूर्णांक ६७ शतांश टक्के तर दक्षिण मध्य मुंबईत ५१ पूर्णांक ८८ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत नैऋत्य मोसमी पावसाच्या पुढल्या वाटचालीसाठी परिस्थिती अनुकूल आहे. आग्नेय अरबी समुद्राचा काही भाग, मालदीवचा आणखी काही भाग, कोमोरीन परिसर, दक्षिण बंगालचा उपसागर आणि अंदमान-निकोबार बेटांच्या बऱ्याच भागात तसंच अंदमान समुद्राच्या आणखी काही भागात तो पुढे सरकेल अंदाज आहे.

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचे वारे आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात उष्णतेची लाट येईल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**